जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांमधील कालबाह्य झालेल्या ०३ वैद्यकीय उपकरणे निर्लेखित करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः निर्लेख-४६२६/प्र.क्र.१४२/खरेदी कक्ष (ई.क्र.१७८६९३६)

१० मजला,गो.ते.रुग्णालय संकूल इमारत
नीवन मंत्रालय,मुंबई-४०० ००१.
दिनांक: २० ऑगस्ट,२०२६

वाचा:-

१) **शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.०४.२०१५**

२) **मुख्य प्रशासकीय अधिकारी कार्यालय उपसंचालक,आरोग्य सेवा,अकोला मंडळ, अकोला यांचे पत्र क्र. उपसंआसे/एचईएमआर/मंडळ निर्लेखनसमा/ CS-YAV/३३५७५-७७/२०२४, दि.०५.०८.२०२४**

३) **उपसंचालक,आरोग्य सेवा,अकोला मंडळ,अकोला यांचे पत्र क्र. उपसंआसे/एचईएमआर निर्लेखन/दोनलक्षांवरील प्रस्ताव/८७१५-१८/२०२६, दि.१२.०३.२०२६**

प्रस्तावना :-

निर्लेखन समिती सदस्य तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी कार्यालय उपसंचालक,आरोग्य सेवा,अकोला मंडळ यांच्या वाचा मधील अ.क्र.२ येथील दि.०५.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, यवतमाळ कार्यालयाच्या अधिनस्त आरोग्य संस्थामधील, कालबाह्य झालेली ०३ उपकरणे निर्लेखित करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयामार्फत सादर करण्यात आला आहे. त्यानुषंगाने उपसंचालक,आरोग्य सेवा,अकोला मंडळ,अकोला यांच्या प्रस्तावातील ०३ वैद्यकीय उपकरणांची खरेदी किंमत ही रु.२.०० लक्ष पेक्षा जास्त असल्याने वाचा अ.क्र.१ येथील शासन निर्णयानुसार वित्तिय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला,उपविभाग क्र.१ मधील अ.क्र.२२ नियम क्र.१४६ अन्वये जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखित करण्याचे अधिकार शासनास असल्याने जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ कार्यालयाच्या, अधिनस्त आरोग्य संस्थांमधील कालबाह्य झालेल्या ०३ वैद्यकीय उपकरणे निर्लेखित करण्यास मान्यता देण्याबाबत वाचा अ.क्र.३ येथील दि.१२.०३.२०२६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

जिल्हा शल्य चिकित्सक,यवतमाळ कार्यालयाच्या अधिनस्त आरोग्य संस्थामधील, खालील विवरणापत्रात दर्शविण्यात आलेली एकूण ०३ कालबाह्य झालेली वैद्यकीय उपकरणे शासन निर्णय,

वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,भाग पहिला, उपविभाग क्र.१ मधील अ.क्र.२२ नियम क्र. १४६ अन्वये विहीत सर्वसाधारण अटी-शर्ती व कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याच्या अधीन राहून निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ. क्र.	संस्थेचे नाव	निर्लेखनपात्र जडवस्तू/उपकरणांचे नाव	संख्या	प्राप्त दिनांक	साठा पुस्तक क्रमांक व पान क्रमांक	खरेदी किंमत	घसारा किंमत	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
१	उप जिल्हा रुग्णालय, पांढरकवडा	Cell Counter Machine	१	०१.०४.२०१०	०७/१७	४,५०,०००	४५,०००	निर्लेखनपात्र
२	उप जिल्हा रुग्णालय, पुसद	X-ray Machine Meditonic १००	१	०८.११.२००४	८६	२,१२,८४०	२१,२८४	निर्लेखनपात्र
३	उप जिल्हा रुग्णालय, पुसद	Sonography Machine	१	०५.१२.२००७	६०	४,१५,१२५	४१,५१३	निर्लेखनपात्र

२. सदरहू कालबाह्य वैद्यकीय उपकरणे/जडवस्तूंचे निर्लेखन करतांना विहीत शासन कार्यपध्दतीचे, नियमांचे व अटी शर्तीचे अनुपालन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख यांची राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२०१७१९२६५३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK VIJAY SHELAR

Digitally signed by DEEPAK VIJAY SHELAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT, 2.5.4.20=a8b4d56939f92ca00d0f1036f37e5c0743e0f0aea72b2f23cc46d5945ab37d69, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8E3FEAC5ACB11AE3D9464A8A336D7067314E8F58B632FCBB7B5B4CF900C4649B, cn=DEEPAK VIJAY SHELAR
Date: 2026.08.20 17:32:06 +05'30'

(दीपक शेलार)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई.

२. संचालक,आरोग्य सेवा,आरोग्य संचालनालय,मुंबई.
३. सह संचालक,आरोग्य सेवा (खरेदी कक्ष),आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
४. सह संचालक,आरोग्य सेवा,रुग्णालये (राज्यस्तर),मुंबई.
५. सह संचालक,आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई/पुणे
६. उपसंचालक,आरोग्य सेवा,अकोला मंडळ,अकोला.
७. उपसंचालक,आरोग्य सेवा (परिवहन),मुंबई.
८. महालेखापल,महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षण/लेखा अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
१०.वित्त विभाग (व्यय-१३),मंत्रालय,मुंबई.
११.सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प कार्यासन),मंत्रालय,मुंबई.
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१३.निवडनस्ती (खरेदी कक्ष).